# वैज्ञानिकांच्या संशोधनात किफायतशीरपणा हवा

## एस. चंद्रशेखर यांचे प्रतिपादन

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** वैज्ञानिक हे नेहमी संशोधनामध्ये शाश्वत विकासाचा पुरस्कार करतात. मात्र, या शाश्वत संशोधनाला जर किफायतशिरपणा किंवा सहज उपलब्धता नसेल, तर ते संशोधन सामान्य जनतेसाठी व्यवहार्य नसते. त्यामुळे वैज्ञानिकांनी आपल्या संशोधनामध्ये किफायतशीरपणा हा घटक प्रामुख्याने समाविष्ट करावा, असे आवाहन केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे सचिव एस. चंद्रशेखर यांनी केले.

सीएसआयआर-नीरीच्या सभागृहात आयोजित 'वन वीक वन लॅब' या उपक्रमाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी निरीचे संचालक डॉ. अतुल वैद्य प्रामुख्याने उपस्थित होते. आज कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, चॅट-जीपीटी यासारख्या तंत्रज्ञानाने वैज्ञानिक समुदायासमोर एक आव्हान उभे केले. याबाबत अधिक संशोधन करणे गरजेचे आहे, असे चंद्रशेखर यांनी सांगितले. 'वन वीक वन लॅब' हा कार्यक्रम केवळ आठवडाभराचा नसून ही निरंतर चालणारी प्रक्रिया असली पाहिजे. वैज्ञानिकांनी वेळ काढून शासकीय शाळांमधील विद्यार्थ्यांना विज्ञान त्यांच्या आयुष्यात कसे बदल घडवून आणू शकते याबाबत प्रबोधन केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाद्वारे सीएसआयआर अंतर्गत येणाऱ्या सर्व संस्थांना निधी पुरवला जात असून नीरी संस्थेने पर्यावरण तसेच नेट झिरो कार्बन उत्सर्जनामध्ये प्रामुख्याने हातभार लावला पाहिजे, असे आवाहन देखील त्यांनी केले. प्रास्ताविकातून नीरीचे संचालक डॉ. अतुल वैद्य यांनी निरीच्या संशोधन कार्याबाबत माहिती दिली. यावेळी केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे सचिव डॉ. एस. चंद्रशेखर यांनी विदर्भातील वातावरणातील बदलांबाबत तसेच औष्णिक ऊर्जा प्रकल्पांच्या प्रभावांचा अभ्यास करण्यासाठी निर्मित 'सेंटर ऑफ एक्सलन्स'चे उद्घाटनही केले. निरीच्या वैज्ञानिक डॉ. साधना रायलू यांनी निरीच्या पर्यावरणीय बदल केंद्राबद्दल माहिती दिली. केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाव्दारे पुरस्कृत या केंद्राद्वारे प्रामुख्याने विदर्भातील औष्णिक केंद्रात निघणाऱ्या प्रदूषणाचे हवामानात होणारे बदल यामध्ये संशोधन होणार असल्याची त्यांनी सांगितले. याप्रसंगी निरीच्या वार्षिक अहवालाचे प्रकाशनही करण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत ८ ते १३ एप्रिल दरम्यान विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.



उद्घाटनप्रसंगी बोलताना एस. चंद्रशेखर. व्यासपीठावर डॉ. अतुल वैद्य, डॉ. साधना रायलू.

लोकसत्ता Sun, 09 April 2023
https://epaper.loksatta.com/c/72131948